सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील दिव्यांग कर्मचा-यांना नायब तहसीलदार संवर्गात काल्पनिक पदोन्नती व मानीव दिनांक देणेबाबत (नाशिक विभाग)...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-१५०७१/३/२०२६-E-९**
(E-१७२४०४८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-०८.१०.२०२६

**वाचा :-**

१. अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.मशा/ कार्या-१/आस्था-३/दिव्यांग निवडसूची २०२६/६६६४५६१/२६, दि.२८.०४.२०२६
२. अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.मशा/ कार्या-१/आस्था-३/ना.त.पदो.दिव्यांग नि.सू. २०२५-२६/६६६४५६१/२०२६, दि.१७.०९.२०२६

**शासन आदेश:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.२९.०७.२०२४ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना दि.३०.०६.२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू केल्याने नाशिक विभागातील सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील खालील दिव्यांग कर्मचाऱ्यांना विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पदोन्नती समितीच्या दि.२७.०४.२०२६ च्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारसीनुसार सन २०१६-१७ ते सन २०२५-२६ या निवडसूची वर्षातून नायब तहसीलदार या संवर्गात पदोन्नतीच्या कोट्यातील उपलब्ध पदांवर काल्पनिक पदोन्नती व मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिव्यांग प्रकार | कर्मचाऱ्याचे नांव | दिव्यांग ज्ये.क्र. | पदोन्नतीचा मानीव दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **निवडसूची वर्ष सन २०१६-१७** | | | | |
| १ | क | श्री.डी.आर.बारी | ०१ | ०७.१०.२०१६ |
| २ | अ | श्रीम.एच.के.वाकडे | ०९ | ०७.१०.२०१६ |
| **निवडसूची वर्ष सन २०१८-१९** | | | | |
| १ | ब | राजेश के. वळवी | १८ | ३०.०१.२०१९ |
| २ | ब | श्री. नरुहलक अ. र. शेख | १९ | ३०.०१.२०१९ |
| ३ | अ | श्री.चंद्रकांत रा. पाटील | २१ | ३०.०१.२०१९ |
| **निवडसूची वर्ष सन २०१९-२०** | | | | |
| १ | ड व इ | श्री. के.एन.गावीत<br>अंतर्गत परिवर्तनाने दिव्यांग प्रकार " क" मधून | ०२ | २२.०१.२०२० |
| २ | क | श्री. डी.पी.कुलकर्णी<br>अंतर्गत परिवर्तनाने दिव्यांग प्रकार " क" मधून | ०४ | २२.०१.२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निवडसूची वर्ष सन २०२०-२१ | | | | |
| १ | क | श्रीम.के.टी.त्रिंबके | ०६ | २४.०६.२०२२ |
| २ | अ | श्री. ग.पु. जेऊलघाले | २२ | २४.०६.२०२२ |
| ३ | ब | श्री.एम.वाय.शेख | ३१ | २४.०६.२०२२ |
| निवडसूची वर्ष सन २०२२-२३ | | | | |
| १ | ड व इ | श्री.बी.जी. घोरपडे<br>अंतर्गत परिवर्तनाने दिव्यांग प्रकार "क" मधून | ०७ | २९.०१.२०२४ |
| २ | ड व इ | श्री.शांताराम पां. पाटील<br>अंतर्गत परिवर्तनाने दिव्यांग प्रकार "क" मधून | १० | २९.१०.२०२४ |
| निवडसूची वर्ष सन २०२४-२५ | | | | |
| १ | ब | श्री.संदिप सा. काकड | ३८ | ३१.०७.२०२५ |
| निवडसूची वर्ष सन २०२५-२६ | | | | |
| २ | क | श्री.सुभाष बा. तायडे | १५ | ०७.१०.२०२६ |

२. उपरोक्त पदोन्नत श्री.चंद्रकांत पाटील, श्री.ग.पु.जेऊघाले, श्री.संदिप काकड व श्री.सुभाष तायडे यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. उपरोक्त कर्मचाऱ्यांना उक्त तक्त्यात नमूद निवडसूची वर्षनिहाय पदोन्नतीच्या कोट्यातील उपलब्ध पदावर खालील अटींच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीने काल्पनिक मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे:-

१) निवडसूची तयार करताना कोणताही ज्येष्ठ कर्मचारी पदोन्नतीसाठी अनवधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.

२) सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना दि. ३०.०६.२०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीने विचारात घेतलेल्या दि.०९.१०.२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या एकत्रित ज्येष्ठतासूचीस कोणत्याही न्यायालयात स्थगिती देण्यात आलेली नाही या अटीच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

३) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि. /१६ ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

४) सदर नियमित पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने उक्त अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क असणार नाही.

५) भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपुर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग या कार्यालयाची राहील.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांना काल्पनिक पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात येत असल्याने त्यांची नायब तहसीलदार संवर्गातील ज्येष्ठता उक्त मानीव दिनांकानुसार निश्चित करावी. उक्त तक्त्यात नमूद वर्षनिहाय निवडसूची

व नायब तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता यादी अद्ययावत करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, नाशिक या कार्यालयाने करावी.

४. संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांनी कळविल्यानुसार सन २०२३-२४ या निवडसूची वर्षात दिव्यांग कोट्यातून काल्पनिक पदोन्नतीचे १ पद (दिव्यांग प्रकार-अ) रिक्त ठेवण्यात आले आहे.

५. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००८१३२२५२०४४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.10.08 13:23:48 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. संबंधित जिल्हाधिकारी.
७. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. संबंधित नायब तहसीलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१३. उप सचिव (आस्था-९) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. सह सचिव (कार्यासन-१२/सेवा-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. निवड नस्ती (कार्यासन आस्था-९), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.